# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 21/10/2021 (गुरूवार)

(दुपार)

---

### शेतीचे वादावरून खुनाचा प्रयत्न करणारे आरोपी स्थानीक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांनी केले जेरबंद

फिर्यादी नामे– इकबाल मोहम्मद शेख वय 50 वर्षे रा. डोंगरगाव ता. हिगंणा जि. नागपुर यांचा मागील 3 वर्षापासुन किन्हारमाकडी येथील शेतीचा वाद नागपूर येथे राहणारे गजानन झोटींग यांच्या सोबत चालु आहे व प्रकरण न्यायालयात चालु आहे. त्याच कारणावरून दि. 20/10/2021 रोजी फिर्यादी इकबाल शेख हा त्याचा ड्रायव्हर तनवीर शेख सोबत दुपारी 03.30 वा. दरम्यान किन्हाळमाकडी चे शेतात गेले असता तेथे हाजर असलेल्या गजानन लक्षमन झोटींग वय 59 वर्षे व त्याचे दोन्ही मुले व त्यांचे मित्रासोबत शेतीचे वादावरून वादविवाद होवुन आरोपीतांनी फिर्यादी व त्याचे ड्रायव्हरला लोखंडी रॉड व कुऱ्हाड व काढयांनी मारून गंभीर जखमी करून नागपूर कडे पळुन गेले. फिर्यादी व ड्रायव्हर हे दोघेही गंभीर जखमी झाल्याने त्याचे फिर्यादी वरून पो.स्टे. बेला येथे अप क. 151/2021 कलम 143, 144, 147, 148, 449, 307 भादंवी सहकलम 4/25 ऑर्म ॲक्ट कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपी नामे– 1) गजानन लक्ष्मण झोटींग वय 59 वर्षे व 2) सागर गजानन झोटींग वय 28 वर्षे दोन्ही रा. कबीर नगर सक्करदरा नागपुर हे पो.स्टे. बेला येथे हजर गेले असता त्यांना त्या गुन्हयात अटक करण्यात आले आहे. प्रकरणाची तात्काळ मा पोलीस अधीक्षक श्री विजयकुमार मगर यांनी दखल घेवुन पोलीस निरीक्षक श्री अनिल जिट्टावार स्था.गु.शा.ना.ग्रा यांना आदेश देवून तात्काळ पथके तयार करून आरोपीतांचा कसुन शोध घेवुन गोपनिय माहितीचे आधावर दिनांक 21/10/2021 चे रात्री संशयीत आरोपी क. 3. हिमांशु उर्फ मोनु राजेन्द्र सोनी, वय 23 वर्ष, रा. नाईक नगर मानेवाडा नागपूर, 4. निलेश गजानन झोटींग वय 32 वर्षे दोन्ही रा. कबीर नगर, सक्करदरा नागपुर यांना ताब्यात होवुन पोलिस सटेशन बेला यांचे ताब्यात देण्यात आले आहे. तसेच दि. 21/10/2021 चे दुपारी यातील आरोपी नामे– आदर्श दिलीपराव कोल्हे, वय 22 वर्ष, रा. बहादुर उमरेड रोड नागपूर यास ताब्यात घेवुन पो.स्टे. बेला येथे पुढील कार्यवाही करीता ताब्यात देण्यात आल, पुढील तपास बेला पोलिस करीत आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्री विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक श्री राहुल माकणीकर यांचे आदेशान्वये पोलीस निरीक्षक श्री अनिल जिट्टावार स्था.गु.शा. यांच्या मार्गदर्शनात सपोनि श्री जितेंद्र वैरागडे, सपोनि अनिल राउत, पोउपनी. श्री जावेद शेख, पोहवा श्री गजेन्द्र चौधरी, श्री महेश जाधव, नरेन्द्र पटले, नापोशि श्री रामराव आडे, पोशि श्री अमृत किनगे, श्री बालाजी साखरे सायबर सेलचे पोशि श्री सतीश राठोड चासफौ श्री साहेबराव चापोहवा श्री भाउराव खंडाते चापोशि लांजेवार यांनी पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर